## *Appendix XVIII (vii)*, (Vide Article - 18.01)

**संयुक्त वन व्यवस्थापन कार्यक्रम / परिस्थितीकी विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी करणेबाबत मार्गदर्शक सूचना**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन परिपत्रक क्र.एफडीएम-2011/प्रक्र100/फ-2**
**मंत्रालय, मुंबई-400 032**
**दिनांक :- 22/12/2011**

वाचा :- 1) शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र.एफडीएम 2011/प्रक्र100/फ-2, दिनांक 5 ऑक्टोबर 2011

2) शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. बैठक2011/प्रक्र 174/फ-5, दिनांक 24 ऑक्टोबर 2011

संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे बळकटीकरण करणे व त्यास ग्रामसभेला जोडणेबाबतचा शासन निर्णय संदर्भ क्र.1 अन्वये तसेच वनक्षेत्र व संरक्षित क्षेत्रात निसर्ग पर्यटन कामांची अंमलबजावणी करण्याबाबतचे निर्णय संदर्भ क्र. 2 च्या शासन निर्णयान्वये जाहीर करण्यात आले आहेत. सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी योग्यरित्या करण्याकरिता शासनाने विविध विभाग विशेषतः वन विभाग, जिल्हापरिषद, आदिवासी विकास विभाग, पशु संवर्धन विभागाने एकत्रित येऊन कामे करणे अपेक्षित आहे व त्यासाठी सविस्तर सूचना खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत. (सदर परिपत्रकातील सूचना मार्गदर्शक स्वरुपाची असून, त्यात नमूद न केलेल्या कार्यवाही संबंधित मुख्य वनसंरक्षक यांची मान्यता प्राप्त करुन करण्याची मुभा राहील)

<u>टीप</u> :- जेथे कुठे अनुदान वितरित करण्याचा उल्लेख आहे, ते अनुदान प्रचलित योजनेनुसार वितरित केले जातील. ज्या योजनांसाठी उदा. बायोगॅस, सुधारित चूल, संकरित गायींकरिता चारा, स्वयंपाकाचा गॅस व निसर्गपर्यटनाचे मालमत्ता व सोई निर्माण करणे इत्यादीसाठी प्रचलित निकष नाहीत ती कामे कॅम्पा, एफडीए, 13 वा वित्त आयोग व 7% वन विकास कर इत्यादीअंतर्गत खालील दिलेल्या सूचनांप्रमाणे राहतील :-

**<u>संयुक्त वन व्यवस्थापन समिती / इको डेव्हलपमेंट समितीचे गठन करणे, सूक्ष्म आराखडा तयार करणे</u>**

- संयुक्त वन व्यवस्थापन / इको डेव्हलपमेंट समितीमार्फत ग्रामपरिसर विकासाबाबतची सविस्तर सूचना परिशिष्ट-1 मध्ये जोडण्यात येत आहे.
- मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद यांनी दिनांक 5 ऑक्टोबर 2011 च्या शासन निर्णयानुसार मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, 1958 च्या कलम 49 च्या तरतूदीनुसार संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे / इको डेव्हलपमेंट समितीचे गठन करण्यासाठी ग्रामसभेची विशेष बैठक घेऊन समितीचे दिनांक 15/1/2012 पर्यंत गठन होईल, याबाबत दक्षता घ्यावी.
- वन विभागाने संयुक्त वन व्यवस्थापन समिती / इको डेव्हलपमेंट समिती सोबत निवडलेल्या वनक्षेत्राबाबत समझोता समयलेख करावे. समझोता समयलेखाचे प्रारुप परिशिष्ट-2 मध्ये जोडण्यात येत आहे.

1

- संयुक्त वन व्यवस्थापन समिती / इको डेव्हलपमेंट समिती यांनी वन विभागाच्या मार्गदर्शनाखाली 31/01/2012 पर्यंत सूक्ष्म आराखडा तयार करावा व त्यास उपवनसंरक्षकांनी दिनांक 10/2/2012 पर्यंत मान्यता प्रदान करावी. सूक्ष्म आराखडा प्रारुप परिशिष्ट-3 मध्ये जोडण्यात येत आहे. सूक्ष्म आराखड्याचे प्रारुप सूक्ष्म आराखडा तयार करताना दिनांक 5/10/2011 च्या शासन निर्णयातील सूचनेचे पालन करावे. सूक्ष्म आराखडा लोकांना समजेल अशा स्वरुपात लिहिले जावेत. त्यामध्ये ग्रामस्थांचे आणि वन अधिकाऱ्यांची कर्तव्य, जबाबदारी व अधिकारांचा स्पष्ट उल्लेख असावा.
- गुरे चराईसाठी किती शुल्क आकारण्यात येईल तसेच समझोता समग्र लेखातील अटींचे पालन न करणा यांकडून किती दंड आकारण्यात येईल, याचा उल्लेख सूक्ष्म आराखड्यात करण्यात यावा.
- मंजूर सूक्ष्म आराखड्याची प्रत उपवनसंरक्षकांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, आदिवासी विभाग, प्रकल्प अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पशुसंवर्धन अधिकारी यांचेकडे पाठवतील. याबरोबरच वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांनी सदर सूक्ष्म आराखड्याची प्रत संबंधित यंत्रणांचे तालुकास्तरीय अधिकाऱ्यांना तत्परतेने उपलब्ध करुन द्यावी. विविध यंत्रणा उपवनसंरक्षक यांचेशी सल्लामसलत करुन शासकीय योजनेतील फायदे प्राधान्याने संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांचे सदस्यांना प्रदान करावेत.
- मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद यांनी त्यांना वन विभागाकडून प्राप्त होणाऱ्या 7% वन महसूलअंतर्गत संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या सदस्यांना बायोगॅस, कुकींग गॅस, सोलर कुकर इत्यादींचा पुरवठा करावा. संबंधितांकडून 1/4 रक्कम रोख / मजूरी (श्रमदान) च्या स्वरुपात प्राप्त झाल्यानंतर उर्वरित 3/4 शासकीय अनुदान अदा करण्यात यावे.

**<u>पशुसंवर्धन व दुग्ध विकास विभागाने करावयाची कार्यवाही</u>**

- वनक्षेत्राजवळील संयुक्त वन व्यवस्थापन समितीने तयार केलेल्या सूक्ष्म आराखड्यामध्ये समाविष्ट गावात कोणत्याही योजनेखाली शेळी व मेंढीचे वाटप करु नये
- अनुत्पादक वळूंचे 100% खच्चीकरण करण्यात यावे.
- त्याव्यतिरिक्त सदर गावात भाकड व अनुत्पादित गुरांच्या ठिकाणी संकरित प्रजातीच्या अधिक दुधाळ गायी देण्याबाबत व्यापक कार्यक्रम राबविण्यात यावा.
- जिल्हाधिकारी यांनी सदर कार्यक्रमासाठी जिल्हा नियोजन समितीअंतर्गत पुरेशी तरतूद करावी.

**<u>प्रकल्प अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांनी करावयाची कार्यवाही</u>**

- कुऱ्हाडबंदी, चराईबंदीबाबत करारनामा केलेल्या गावात सुधारित चूल, स्वयंपाक गॅस, सौरउर्जेवर आधारित संयंत्र, उपकरणे इत्यादींचा पुरवठा अनुदान तत्वावर करण्यात यावे.
- लाभार्थींची निवड संयुक्त वन व्यवस्थापन समितीद्वारे इको डेव्हलपमेंट समितीद्वारे करण्यात येईल.
- लाभार्थी यांनी 1/4 रक्कम रोखीने भरल्यानंतरच उर्वरित 3/4 रक्कम उपलब्ध करुन देण्यात येईल.

**<u>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद यांनी करावयाची कार्यवाही</u>**

- संयुक्त वन व्यवस्थापन कार्यक्रम प्रभावीपणे राबविणाऱ्या व उपवनसंरक्षक यांनी शिफारस केलेल्या गावात अनुदान तत्वावर बायोगॅस संयंत्राचा पुरवठा करण्यात यावा.

- लाभार्थींची निवड संयुक्त वन व्यवस्थापन / परिस्थितीकी विकास समितीव्दारे करण्यात येईल. लाभार्थी यांनी 1/4 रक्कम रोख अथवा श्रमदानाच्या स्वरुपात उपलब्ध करुन दिल्यानंतर 3/4 रक्कम अदा करण्यात येईल.
- शासकीय गायरान जमिनीवर महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत ग्रामपंचायतीमार्फत मोठया प्रमाणावर वैरण विकास कार्यक्रम राबविण्यात यावे.

**निसर्ग पर्यटन अंतर्गत पर्यटन विकासास चालना देणे**

- गृह पर्यटन विकासाअंतर्गत लाभार्थींची निवड संयुक्त वन व्यवस्थापन समिती / इको डेव्हलपमेंट समिती करेल.
- संयुक्त वन व्यवस्थापन / इको डेव्हलपमेंट समिती लाभार्थी सोबत 10 वर्षासाठी करारनामा करेल. गृह पर्यटन विकासांतर्गत विकसित पायाभूत सुविधेचा वापर निसर्ग पर्यटनासाठीच करता येईल.
- लाभार्थी यांनी 1/4 रक्कम संयुक्त वन व्यवस्थापन समितीकडे / इको डेव्हलपमेंट समितीकडे जमा केल्यानंतर शासनाचा 3/4 हिस्सा समितीच्या खात्यात वर्ग करण्यात येईल. कामाची प्रगती लक्षात घेऊन निधीचे वितरण 3 समान हप्त्यात करण्यात यावे.
- गृह पर्यटन विकासाकरिता आदिवासी उप योजनाअंतर्गत पर्याप्त तरतूद करण्यात यावी.

**लघुसिंचन विभागाने करावयाची कार्यवाही**

- साठवण क्षमता कमी झालेले सर्व सिंचन तलाव, गाव तलाव, पाझर तलाव, कोल्हापूरी बंधारे व इतर जलसाठयांचे नुतनीकरण महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत करण्यात यावे.
- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेव्यतिरिक्त शिवकालीन पाणी पुरवठा योजना तसेच महात्मा फुले भूमी जलसंधारण योजनेअंतर्गत प्राप्त होणा-या निधीचा तलाव दुरुस्ती व गाळ काढण्यासाठी विनियोग करण्यात यावा.

**विहिरींना जमिनीपासून 3 फुट वरपर्यंत दगडी भिंत उभारणे**

- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना / रोजगार हमी योजना, धडक सिंचन योजनेअंतर्गत बांधण्यात येणा-या विहिरींना जमिनीपासून 3 फुट वरपर्यंत दगडी भिंत उभारण्याची तरतूद अंदाजपत्रकात करावी.
- आधी बांधण्यात आलेल्या विहिरींवर 3 फुट दगडी गुंडाळ बांधण्याची कार्यवाही करण्यात यावी.
- परिस्थितीकी विकास कार्यक्रम राबविणा-या ज्या गावांच्या परिसरात कालवे व महामार्ग अस्तित्वात आहेत तेथे वन्यप्राण्यांसाठी सुरक्षित कृत्रिम संचार मार्ग निर्माण करण्यात यावे.

**मासेमारीचे कंत्राट स्थानिक संस्थांना देण्याबाबत**

परिस्थितीकी विकास कार्यक्रम राबविणा-या ज्या गावांमध्ये सहकारी संस्थांना अस्तित्वात आहेत तेथे त्या संस्थांना मासेमारीचे कंत्राट देण्यात यावे.

3

संयुक्त वन व्यवस्थापन सूक्ष्म नियोजन आराखड्याचे अंमलबजावणीचा आढावा

- जिल्हाधिकारी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, उपवनसंरक्षक (प्रादेशिक/वन्यजीव), उपसंचालक, सामाजिक वनीकरण, उप आयुक्त पशुसंवर्धन, प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास विभाग यांची संयुक्त बैठक महिन्यातून एकदा घेऊन ह्या कार्यक्रमाच्या प्रगतीचा आढावा घ्यावा.
- मंजूर सूक्ष्म आराखड्यात समाविष्ट कामे / विविध यंत्रणेमार्फत करण्यात येतील, याची खात्री मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद यांनी करावी.
- तालुका स्तरावर गट विकास अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली असलेल्या समितीव्दारे संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे मंजूर सूक्ष्म आराखड्याअंतर्गत कामाच्या प्रगतीचा आढावा घेतला जाईल. या समितीत तालुका पशुसंवर्धन अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, उप अभियंता, लघु पाटबंधारे असतील. तसेच समितीचे सदस्य सचिव, संबंधित वनक्षेत्रपाल राहतील.

या परिपत्रकासोबत सहपत्रीत परिशिष्ट-2 व परिशिष्ट-3 मध्ये अनुक्रमे समझौता सम्मतलेख आणि सूक्ष्म नियोजन आराखड्याचे नमुने मार्गदर्शनासाठी असून, स्थानिक परिस्थितीनुसार संबंधित मुख्य वनसंरक्षक यांच्या मान्यतेने सुधारणा करता येईल.

सदर परिपत्रक ग्रामविकास विभाग, रोजगार हमी योजना व जलसंधारण विभाग, नियोजन विभाग आणि वित्त विभाग यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(रत्नाकर गायकवाड)
मुख्य सचिव

प्रति:
प्रधान सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-32
प्रधान सचिव, कृषी, मंत्रालय, मुंबई-32
प्रधान सचिव, कृषी, पशु संवर्धन, दुग्ध विकास आणि मत्स्य विभाग, मंत्रालय, मुंबई-32
प्रधान सचिव (रोजगार हमी योजना), मंत्रालय, मुंबई 32
प्रधान सचिव (नियोजन), मंत्रालय, मुंबई-32
प्रधान सचिव (वित्त) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई 32
प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई 32
प्रधान सचिव (ग्रामविकास), मंत्रालय, मुंबई-32
प्रधान सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव (जलसंधारण), मंत्रालय, मुंबई-32
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर
प्रधान मुख्य वनसंरक्षक (संयुक्त वन व्यवस्थापन), महाराष्ट्र राज्य, नागपूर
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ, नागपूर
प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा महासंचालक, सामाजिक वनीकरण, पुणे
सर्व अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक / मुख्य वनसंरक्षक / वनसंरक्षक
सर्व मुख्य वनसंरक्षक तथा उप महासंचालक, सामाजिक वनीकरण विभाग
सर्व [illegible]

सर्व जिल्हाधिकारी
सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
आयुक्त, आदिवासी विकास,
आयुक्त (कृषी), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक (फलोत्पादन), महाराष्ट्र राज्य, पुणे
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, नागपूर
सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा
उपवनसंरक्षक (प्रादेशिक/वन्यजीव) / सर्व उपसंचालक, सामाजिक वनीकरण / सर्व उप आयुक्त (पशुसंवर्धन)
सर्व प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास विभाग
सर्व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र 1 / 2, मुंबई / नागपूर.
महालेखापाल (लेखा परिक्षा) महाराष्ट्र 1 / 2, मुंबई / नागपूर.
संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई
वन विभागातील सर्व सह सचिव / उप सचिव / अवर सचिव / विशेष कार्य अधिकारी
निवड नस्ती (कार्यासन फ-2), महसूल व वन विभाग, मंत्रालय,

5

परिशिष्ट-१

## संयुक्त वन व्यवस्थापन / परिस्थितीकी विकास समितीमार्फत ग्रामपरिसर विकासासाठी सविस्तर मार्गदर्शक सूचना

**प्रस्तावना :-**

राष्ट्रीय वन्यजीव कृती आराखडा २००२-२०१६ अन्वये तसेच वन्यप्राणी (संरक्षण) अधिनियम १९७२ (सुधारीत २००६) मधील तरतुदींनुसार वने / वन्यजीव संवर्धनाकरीता संरक्षीत क्षेत्रांलगतच्या गावांमध्ये ग्रामीणांचा सक्रीय सहभाग प्राप्त होणे अपेक्षीत आहे. महाराष्ट्र राज्यातील अभयारण्ये, राष्ट्रीय उद्यान व व्याघ्र प्रकल्पाचे अति संरक्षीत क्षेत्रांमध्ये अद्यापही अनेक गावे आहेत. त्यांच्या पुनर्वसनाबाबतचे धोरण महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन कायद्यानुसार राबविणे सुरु आहे. व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रातील गावांचे पुनर्वसन होणार नसल्याने तेथे परिस्थितीकी विकास कार्यक्रम राबवावयाचा आहे. याच धर्तीवर अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने यामधील गावांचे जोपर्यंत पुनर्वसन होत नाही तोपर्यंत या गावांमध्येही परिस्थितीकी विकास कार्यक्रम (EDP) राबविण्याचे ठरले आहे. सोबतच वन्यप्राणी (संरक्षण) अधिनियम १९७२ सुधारीत २००६ नुसार घोषीत करण्यात आलेल्या संवर्धन राखीव क्षेत्र (Coservation Reserve) व लोकसंवर्धन राखीव क्षेत्र (Community Reserve) यामधील गावांमध्येही परिस्थितीकी विकास कार्यक्रम राबवावयाचा आहे. या सर्व गावांमध्ये स्थानिक ग्रामीणांचा वन / वन्यजीव संवर्धनामध्ये सहभाग घेण्याच्या दृष्टीने ग्रामसभांसोबत करारनामा करणे, सुक्ष्म-आराखडा तयार करणे, आराखड्यामधील नमूद काम करणे व त्याकरीता परिस्थितीकी विकास कार्यक्रम राबविणे अभिप्रेत आहे. सदर कार्यक्रम राबवितांना ग्रामसभा हा केंद्रबिंदू मानून अधिकार, कर्तव्ये व जबाबदाऱ्यांची निश्चिती करणे आवश्यक आहे. सदर कार्यक्रम शासनाच्या सर्व विभागांनी मिळून राबवावयाच्या आहे.

याव्दारे राज्यातील संरक्षीत वनक्षेत्र, त्या सभोवतालचे क्षेत्रांमध्ये निर्माण झालेला मानव-वन्यप्राणी संघर्ष कमी करुन सहजीवन प्रस्थापीत करणे शक्य होणार आहे.

## मार्गदर्शक सूचना

**परिस्थितीकी विकास समितीची उद्दिष्टे, समितीचे गठण, कर्तव्ये व जबाबदाऱ्या, समितीला होणारे फायदे याबाबतचे धोरण :**

**१) उद्दिष्टे :** १) संरक्षीत वनक्षेत्रांच्या विकासामध्ये ग्रामस्थांचे योगदान घेणे.

२) मानव-वन्यजीव यांच्यामधील संघर्ष कमी करुन सहजीवन प्रस्थापीत करणे.

३) वन्यजीव संवर्धनातून मिळणारे फायदे ग्रामविकासाकरीता वापरणे.

४) ग्रामविकास साधत असतानांच नजीकच्या संरक्षीत क्षेत्रावरील मानवी दबाव कमी करण्याकरीता प्रयत्न करणे.

५) गांवनिहाय सुक्ष्म नियोजन आराखडा (Micro plan) तयार करुन गावांचा चिरंजीवी विकास साधण्यासाठी सर्व विभागांच्या मदतीने प्रयत्न करणे.

२) **कार्यक्रमांअंतर्गत निवड करावयाचे क्षेत्र :**

राज्यातील अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने, व्याघ्र प्रकल्प, संवर्धन राखीव क्षेत्र (Conservation-Reserve) व लोकसंवर्धन-राखीव क्षेत्र (Community Reserve) व त्यांच्या बफर क्षेत्रातील असल्यास गांवे.

३) **ग्राम परिस्थितीकी विकास समितीचे गठण**

सदर समिती मुंबई पंचायत अधिनियम, १९५७ च्या कलम ४९ अंतर्गत असलेल्या तरतुदीस अनुसरुन राहील या समितीची रचना याच अधिनियमातील कलम ४९ मधील उप कलम १,२.३,४ नुसार राहील व त्यास वन्यजीव संवर्धन आणि विकासाकरीता ग्राम परिस्थितीकी विकास समिती असे संबोधता येईल. या समितीची निर्मीती ग्रामसभा वन्यजीव विभागाच्या मार्गदर्शनाखाली करेल. या समितीचा कालावधी पंचायतीच्या. कालावधीशी सुसंगत राहील. या समितीचे अधिकार, कार्यव्याप्ती याबाबत ग्रामसभेने पंचायतीशी सल्लामसलत करुन निश्चित करावयाचा आहे व त्याचप्रमाणे या समितीच्या कामकाजावर ग्रामसभेच्या नियंत्रणाखाली देखरेख आणि कार्यपध्दतीचे नियमन करावयाचे आहे. या समितीमध्ये १२ आणि कमाल २४ अशी सदस्य संख्या असेल. या सदस्यांपैकी १/३ पेक्षा कमी नाही असे सदस्य पंचायतीमधील राहतील आणि निम्म्याहून कमी महिलांची संख्या नसेल. या व्यतिरिक्त शासनाने निर्देश दिल्यानुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त आणि भटक्या जमाती यांनाही प्रतिनिधीत्व अनिवार्य असेल. महिला सदस्यांची नियुक्ती करतांना गाव पातळीवरील महिला ग्राम सभेने केलेली शिफारस विचारात घेणे आवश्यक असेल. अशारितीने स्थापन करण्यात येणाऱ्या ग्राम परिस्थितीकी विकास समितीचा ठराव ग्रामसभा पारित करुन स्थानिक वनक्षेत्रपाल यांना पाठवेल. शासनाच्या वतीने ग्राम परिस्थितीकी विकास समितीचे पदसिध्द सदस्य सचिव वनपाल / वनरक्षक हे कार्य करतील. सर्वसाधारणपणे ज्या गांवाची लोकसंख्या १००० पेक्षा अधिक असेल तेथे वनपाल सदस्य सचिव राहतील.

आदिवासी क्षेत्रामध्ये ग्रुप ग्रामपंचायतीमध्ये वस्ती / पाडे असतील तर प्रत्येक वस्ती / पाडे यांची स्वतंत्र ग्राम परिस्थितीकी विकास समिती त्यांच्या ग्रामसभेमधून करावी व त्यामध्ये वस्ती / पाडे यामधील लोक सदस्य म्हणून पात्र राहतील.

४) **करारनामा :**

ग्राम परिस्थितीकी विकास कार्यक्रम राबविण्यात येणाऱ्या गावांच्या ग्रामसभांनी सर्वप्रथम सदर कार्यक्रम राबविण्यास तयार असल्याचा ठराव घेणे आवश्यक राहील. सदर ठरावामध्ये ग्राम परिस्थितीकी विकास कार्यक्रमांअंतर्गत मिळणारे फायदे घेण्याकरीता कुऱ्हाड बंदी, चराई बंदी, माकड गुरांची संख्या कमी करुन दुधाळ जनावरे पाळणे, अनुत्पादक वळुंचे १००% खच्चीकरण करणे, सर्व गुरांचे लसीकरण करणे, गुरांना गोठ्यातच चारा पुरविणे, वनवणवा नियंत्रण व संरक्षण कामात सहकार्य करणे, गौण वनोपजांचा ऱ्हास थांबविणे या बाबींमध्ये गावाच्या जबाबदाऱ्या व कर्तव्ये पार पाडण्यास ग्रामसभेनी संमती घेणे आवश्यक राहील.

५) **सूक्ष्म नियोजन आराखडा तयार करणे**

वन, वन्यजीव व जैवविविधता यांचा अविभाज्य संबंध असल्याने ग्राम परिस्थितीकी विकास समिती वन्यजीव विभागाच्या सहकार्याने संरक्षीत क्षेत्राचे संरक्षण, वन्यजीवांचे व जैव विविधतेचे संरक्षण, संवर्धन, मृद व जलसंधारण, गावविकास, रोजगार निर्मिती आणि उत्पन्न वाढीबाबत योजना या सर्व बाबींचा विचार करुन गावाचा सूक्ष्म नियोजन आराखडा तयार करेल. आराखडयामध्ये मानव-वन्यप्राणी संघर्ष कमी करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर भर देण्यात येईल. प्रामुख्याने संरक्षीत क्षेत्रावर जैविक दबाव कमी करणे, सुधारित चुली, बायोगॅस, स्वयंपाक गॅस व तत्सम साधनांचा वापर, चरगोठा व त्याच्याशी निगडीत चारा निर्मिती, वन्यप्राण्यांव्दारे पीक नुसान कमी करण्यासाठी सौर कुंपण लावणे, शेतामध्ये फळबाग लागवड करणे, वनवणवा नियंत्रण करणे, गावा नजिकच्या निसर्ग पर्यटन स्थळांची देखभाल तथा मार्गदर्शकांची नियुक्ती, निसर्ग पर्यटन इत्यादी बाबींचा अंतर्भाव असेल.

गावाचा सूक्ष्म नियोजन आराखडा संरक्षीत क्षेत्राच्या व्यवस्थापन आराखडयाच्या तत्वप्रणालीनुसार असेल. त्यामध्ये वनसंवर्धन अधिनियम, १९८०, भारतीय वन अधिनियम, १९२७, वन्यप्राणी (संरक्षण) अधिनियम, १९७२ (सुधारीत २००६), वनहक्क अधिनियम, २००६ अंतर्गत तरतुदी व इतर संबंधीत अधिनियमाचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल. ग्राम परिस्थितीकी समिती सदर योजना ग्रामसभेशी सल्लामसलत करुन शासनाच्या ईतर सर्व योजनांचा अभ्यास करुन उपवनसंरक्षक /वनसंरक्षक / मुख्यवनसंरक्षक (वन्यजीव) यांचेकडे सादर करेल. सूक्ष्म योजना प्राप्त झाल्यानंतर उपवनसंरक्षक /वनसंरक्षक / मुख्यवनसंरक्षक (वन्यजीव) आराखडयात सुचविलेल्या तांत्रीक, प्रशासकीय व कायद्याने आक्षेपाई असणाऱ्या कामाबाबत संबंधित विभागांसह ग्रामसभेसोबत चर्चा करतील यानंतर सुक्ष्म नियोजन आराखडयास मंजुरी देऊन ग्राम परिस्थितीकी विकास समितीस कळवतील. सुक्ष्म नियोजन आराखडा तयार झाल्यानंतर पुढील २ महिन्यात करारनामा तयार करवून घेण्याची जबाबदारी संबंधित उपवनसंरक्षक /वनसंरक्षक / मुख्यवनसंरक्षक (वन्यजीव) यांची राहील.

ग्राम परिस्थितीकी विकास समिती त्यांच्या सदस्यांना गायरान क्षेत्रात तसेच जे सदस्य गावाच्या सुक्ष्म नियोजन आराखडयाची अंमलबजावणी करणार नाहीत जसे ते सदस्य अनाधिकृतरित्या वृक्षतोड, चराई आणि अतिक्रमण करतील तसेच वनातील संरक्षणामध्ये सहभागी होणार नाहीत अशा सदस्यांना ग्राम परिस्थितीकी विकास समिती दंड आकारु शकेल किंवा त्या सदस्यांना निसर्ग पर्यटन तसेच प्रवेश शुल्का सारख्या फायद्यापासून वंचित ठेवण्यात येईल.

अभयारण्ये, राष्ट्रीय उद्यान, व्याघ्र प्रकल्प व त्यांचे बफर क्षेत्र असल्यास त्यामध्ये गांवनिहाय ग्राम परिसर विकास कार्यक्रमांअंतर्गत विविध योजनानुसार सुक्ष्म नियोजन करण्यासाठी क्षेत्र स्तरावर संबंधीत संरक्षीत क्षेत्राचे प्रमुख यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करावी. सदर समितीचे सदस्य तहसिलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, पशुधन विकास अधिकारी, उप अभियंता जि.प. सिंचन हे राहतील. तसेच, जिल्हास्तरावर मार्गदर्शन व पर्यवेक्षण करणारी समिती जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली राहील. सदर समिती सुक्ष्म नियोजन व त्याच्या अंमलबजावणीचा दरमहा आढावा घेईल.

६) **ग्राम परिस्थितीकी विकास समितीचे बचत खाते**

शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधीच्या व्यवस्थापनेच्या उद्देशाकरिता राष्ट्रीयीकृत बँक किंवा पोस्ट ऑफीसमध्ये संयुक्त बचत खाते उघडण्यात येईल. सदर खात्याचे संचालन कार्यकारी समितीचे अध्यक्ष व सदस्य-सचिव या दोघांव्दारे संयुक्तपणे करण्यात येईल. सदर बचत खात्यास "सरकारी खाते" असे

म्हणावे. या खात्यांतर्गत होणाऱ्या निधीच्या विनियोगास उपवनसंरक्षक / वनरक्षक / मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांचे स्तरावर मंजुरी घेतली जाईल.

<u>वार्षिक लेखा परिक्षण</u> : ग्राम परिस्थितीकी विकास समितीच्या सरकारी खात्याचे राज्य वन विकास यंत्रणा (SFDA) करिता शासनाने प्रचलित केलेल्या लेखापरिक्षण पध्दतीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

इतर स्त्रोतांकडून आणि समितीच्या स्वतःच्या उत्पन्नातून प्राप्त होणाऱ्या निधीच्या व्यवस्थापनेच्या उद्देशाकरिता राष्ट्रीयकृत बँक किंवा पोस्ट ऑफीसमध्ये स्वतंत्ररित्या बचत खाते उघडण्यात येईल. सदर खात्याचे संचालन अध्यक्ष व कोषाध्यक्ष किंवा कार्यकारिणीतील एक सदस्य संयुक्तपणे करतील. सदर बचत खात्यास "ग्राम परिस्थितीकी विकास समिती खाते" असे म्हणावे. सदरहू खात्यातील निधिच्या विनियोगास ग्रामपंचायतीच्या आमसभेअंतर्गत मंजुरी घेतली जाईल.

**७) ग्राम परिस्थितीकी विकास योजनेअंतर्गत खालील योजनांमध्ये समन्वय साधून संरक्षीत वनक्षेत्रांवरील दबाव कमी करणे व त्यातून मानव-वन्यजीव संघर्ष सोडविणे.**

१. म.ग्रा.रो.ह.यो. अंतर्गत फलोत्पादन विकास योजनेची अंमलबजावणी
२. सुधारीत चुल, स्वयंपाक गॅस वितरण कार्यक्रम राबविणे
३. बायोगॅस योजनेची अंमलबजावणी
४. अनुत्पादक वळुंचे १००% खच्चीकरण, गुरांचे लसीकरण करणे व भाकड गुरे कमी करणाऱ्यांना अधिक दुधाळ जनावरांचे वाटप करणे / खरेदी करण्यास प्रवृत्त करणे.
५. शासकीय गायरान जमिनीवर म.ग्रा.रो.ह.यो. अंतर्गत वृक्षारोपण व वैरण विकास कार्यक्रम
६. सुवर्णजयंती रोजगार योजने अंतर्गत आदिवासी युवकांना गाईड, ड्रायव्हर म्हणून प्रशिक्षीत करुन त्यांना सामुग्री वाटप करणे.
७. सर्व सिंचन तलाव, गाव तलाव, पाझर तलाव, कोल्हापूरी बंधारे व इतर जलसाठे यांचे नुतनीकरण करणे व सिंचन तलावाच्या मग्रारोहयो अंतर्गत नुतनीकरणाच्या कामासाठी तसेच वन तलावांच्या कामासाठी पालक अभियंता म्हणून नेमणूक करणे.
८. धडक सिंचन विहीर / पंतप्रधान पॅकेज विहीर / रोहयो विहीर अपूर्ण कामे पूर्ण करणे.
९. विहीरींना जमीनी पासून ३ फुट वर दगडी भिंत उभारणे.
१०. मासेमारीचे, वनवणवा नियंत्रणाचे कंत्राट स्थानिक संस्थांना मिळणेबाबत.
११. अपारंपारीक उर्जास्त्रोतांचा वापर करणे, सौर कुंपण, सौर उर्जेव्दारे विजेच्या उपकरणांचा वापर व्यापक प्रमाणात करण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषदव्दारे संचालीत योजनांचा समावेश करणे.
१२. आदिवासी विकास विभागाव्दारे संचालीत अनेक योजनांचा आवश्यकतेनुसार समावेश करणे.
१३. स्वयंरोजगार प्रशिक्षणाकरीता औद्यागीक प्रशिक्षण व तंत्र संस्था तसेच पर्यटन व्यवसाय संस्थांना सहभागी करणे.
१४. वैद्यकीय शिबीरांचे आयोजन.
१५. खाजगी क्षेत्रावर वृक्षारोपन, बांबू बीज वाटप, किसान रोपवाटीका कार्यक्रम सामाजीक वनीकरण विभागातर्फे राबविणे.
१६. शैक्षणीक कार्यक्रम.

अ) महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत फलोत्पादन विकास योजनेची अंमलबजावणी

सदर योजने अंतर्गत परिस्थितीकी विकास कार्यक्रम राबविण्याऱ्या गावांमध्ये मोठया प्रमाणावर फळोत्पादन विकास योजनेची म.ग्रा.रो.ह.यो. अंतर्गत अंमलबजावणी करावयाची आहे. शेतामध्ये जांभूळ, आवळा, आंबा, सिताफळ, पेरु, आदिवासी क्षेत्रांमध्ये मोहाची झाडे आदी फळझाडांची लागवड करावयाची आहे. तालुका कृषि अधिकारी यांनी अंदाजपत्रके तयार करुन संबंधीत तहसिलदारांकडे प्रशासकीय मान्यतेस सादर करावेत. सदर योजनेमुळे वन क्षेत्रालगतच्या शेतांमधील पिकांचे वन्यप्राण्यांमुळे वारंवार होणारे नुकसान टळेल व त्यामुळे शेतकरी -वन्यजीव संघर्ष कमी होईल तसेच शेतकऱ्यांनाही ३ वर्षपर्यंत अनुदान तत्वावर फळबाग विकसीत करता येईल. परिणामी सदर फळबागांमुळे एकंदरीत वनक्षेत्राची व्याप्ती वाढेल तसेच शेतकऱ्यांनाही त्यातून दिर्घकाळ उत्पन्न मिळेल.

**ब) सुधारीत चुल, स्वयंपाक गॅस वितरण कार्यक्रम राबविणे**

संरक्षीत क्षेत्रातील लगतच्या गावातील लोक जळतणासाठी मोठया प्रमाणावर जंगलातील लाकडांचा वापर करतात, त्यासाठी लहान-मोठी वृक्ष तोडतात. सदर गावांमध्ये सुधारीत चुल (ग्रामोपयोगी लोक विज्ञान केंद्र, वर्धा निर्मीत) वितरण कार्यक्रम राबवून लोकांना सदर चुल वापरण्याकरीता प्रवृत्त केल्यास पालापाचोळा वापरुन ज्वलनाची गरज पुर्ण होईल. तसेच त्यातून कोळसाही निर्माण होईल. सुधारीत चुल वितरणासाठी प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा यांनी निधी उपलब्ध करुन द्यावा अथवा जिल्हाधिकारी यांना जिल्हा नियोजन विकास समिती अंतर्गत नाविण्यपूर्ण निधी खर्चीता येईल. या सुधारीत चुलीच्या वापराबाबत श्री. समिर कुर्वे, ग्रामोपयोगी विज्ञान संस्था, दत्तपूर, वर्धा यांचेशी संपर्क करुन त्याबाबत एक प्रात्यक्षिक मेळावा संबंधीत गावांमध्ये घ्यावा. ज्या ठिकाणी गॅस सिलेंडरचा पुरवठा करणे शक्य आहे तेथे प्राधान्याने स्वयंपाकाचा गॅस पुरविण्यात यावा व त्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात यावा.

**क) बायोगॅस योजनेची अंमलबजावणी**

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी अशा क्षेत्रामध्ये बायोगॅस योजना प्रभाविपणे राबवावी, लोकांना बायोगॅस संयंत्र वापरण्याबाबत प्रवृत्त करावे, तसेच जुने बायोगॅस संयंत्र वापरात आणण्यासाठीही लोकांना प्रवृत्त करावे. जेणेकरुन त्यांची ज्वलनासाठी वनातील लाकडांची गरज कमी होईल.

वनांच्या संरक्षणात लोकांचा सहभाग घेण्याचे दृष्टीकोणातून राज्यात १९९२ पासून ग्रामीणांच्या सहभागातून ग्राम परिसर विकास कार्यक्रम राबविण्यात येत आहे. सदर कार्यक्रमास चालना देण्यासाठी दिनांक ५/१०/२०११ च्या शासन निर्णयान्वये संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या बळकटीकरणासाठी पावले उचलली असून संयुक्त वनव्यवस्थापन समितीस ग्रामसभेला जोडण्याबाबतचा निर्णय घेतले आहे. सदर शासन निर्णयात संयुक्त वन व्यवस्थापन समितीस देण्यात येणाऱ्या विविध फायद्याचा उल्लेख शासन निर्णयाच्या परिच्छेद ९(इ) मध्ये असून समितीच्या कार्यक्षेत्रातून जिल्हापरिषदेस प्राप्त होणाऱ्या वन महसूलाच्या ७% अनुदान जिल्हापरिषदेव्दारे संबंधीत समितीला देण्याबाबतची तरतूद देखील करण्यात आलेली आहे. याचा लाभ ग्रामपरिस्थितीकी विकास कार्यक्रम राबविणाऱ्या गावांनाही देण्यात यावा.

वरील दोन्ही योजनांची अंमलबजावणी करतांना ग्राम परिस्थितीकी विकास समितीने वनातून जळावू लाकडे आणणे बंद करण्यात तयार असणाऱ्या कुटूंबाचीच निवड करावी. सुधारीत चुली वा गॅस

सदर लाभार्थ्यांनी विकल्यास किंवा त्याचा वापर करणे बंद केल्यास त्याची जबाबदारी परिस्थितीकी विकास समितीची राहील. अशा लाभार्थ्यांकडून दंड वसूल करण्याचे अधिकार समितीस राहतील.

**ड) अनुत्पादक वळुंचे १००% खच्चीकरण, गुरांचे लसिकरण करणे व भाकड गुरे कमी करणाऱ्या कुटूंबांना अधिक दुधाळ जनावरांचे वाटप करणे / खरेदी करण्यास प्रवृत्त करणे.**

संरक्षीत क्षेत्रांमधील व लगतच्या गावांतील लोकांकडे मोठया प्रमाणावर भाकड गुरांची संख्या असून अशा गाई, म्हशी, बकऱ्या या वनात विशेषत: पावसाळ्यात व हिवाळ्यात चराईकरीता जातात. त्यामुळे वन संवर्धन व वन्यजीव संवर्धनामध्ये अडथळा निर्माण होतो. वनांची वाढ खुंटते, व या भाकड जनावरांपासून लोकांनाही उत्पन्न मिळत नाही. अशा भाकड जनावरांची संख्या कमी करणाऱ्या कुटूंबांना दुधाळ जनावरांचे वाटप करण्याचा कार्यक्रम उपआयुक्त (पशुसंवर्धन) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी राबवावा. तसेच लोकांना अधिक दुधाळ जनावरांचे वाट विविध योजनेतून करावे व लोकांनाही अधिक दुधाळ जनावरे खरेदी करण्यास प्रवृत्त करावे. वाटप करण्यात आलेली जनावरे व वळु विकल्यास त्याची जबाबदारी ग्राम परिस्थितीकी विकास समितीची राहील व अशा समितींना विविध योजनांचे लाभ देण्याबाबत पुनर्विचार करण्यात येईल. सोबतच अनुत्पादक वळुंचे १००% खच्चीकरण करावे व उत्तम प्रतिचा वळु पाळण्यास प्रेरीत करावे. परिणामी अशा जनावरांना वनात मोकाट चराईसाठी न पाठविता त्यांना गोठयातच चारा उपलब्ध करुन द्यावा. यासाठी लाभार्थ्यांनी श्री. रवि पाटील, सारीपुत्र मेमोरिअल संस्था, चांदूरबाजार जि. अमरावती यांचेशी संपर्क करुन एक प्रात्यक्षिक मेळावा संबंधीत गावांमध्ये घ्यावा. संबंधीत जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी पशुधन विकास अधिकाऱ्यांव्दारे अशा क्षेत्रांसाठी अनुत्पादक वळुंचे खच्चीकरण व गुरांचे लसीकरणाबाबत नियोजनबध्द कार्यक्रम राबवावा. अशा क्षेत्रामध्ये शासनाच्या कोणत्याही योजनेअंतर्गत बकरी व मेंढी पालनाकरीता वाटप केल्या जाणार नाही याबाबत सर्व विभागांनी दक्षता घ्यावी.

**ई) शासकीय गायरान जमिनीवर म.ग्रा.रो.ह.यो. अंतर्गत वृक्षारोपन व वैरण विकास कार्यक्रम**

संरक्षीत क्षेत्र व त्यांचे बफर मधील गावांमध्ये लोकांचा संरक्षीत क्षेत्रावरील दबाव कमी करण्याचे दृष्टीने व त्यांना मुबलक चारा उपलब्ध करुन देण्यासाठी उपलब्ध शासकीय गायरान जमिनीवर मोठया प्रमाणावर म.ग्रा.रो.ह.यो. अंतर्गत वृक्षारोपण व वैरण विकास कार्यक्रम जिल्हाधिकाऱ्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी व उपसंचालक सामाजीक वनीकरण यांचे सहकार्याने राबवावा. सदर योजनेकरीता जिल्हाधिकाऱ्यांनी तहसिलदारांव्दारे सदर योजनेकरीता उपलब्ध शासकीय गायरान जमीनीचे क्षेत्र निश्चित करावे व उपसंचालक सामाजिक वनिकरण यांनी लागवड अधिकाऱ्यांव्दारे उपलब्ध क्षेत्रानुसार अंदाजपत्रके तयार करुन तांत्रिक मान्यता द्यावी. १० हेक्टर पर्यंत क्षेत्रावर सदर योजनेची अंमलबजावणी यंत्रणा ही ग्राम पंचायत राहील मात्र तांत्रिक सहाय्य सामाजिक वनिकरण विभागाने द्यावे. त्यापेक्षा मोठ्या क्षेत्रांवर सामाजिक वनिकरण विभागानेच ही योजना राबवावी. सदर योजनेअंतर्गत कुंपन, चौकीदार तसेच रोपांना पाणी देण्याची सुविधा प्रस्तावित करावी.

**फ) सुवर्णजयंती रोजगार योजनेअंतर्गत आदिवासी युवकांना मार्गदर्शक, ड्रायव्हर म्हणून प्रशिक्षीत करुन त्यांना सामुग्री वाटप करणे.**

वन व वन्यजीव संवर्धनामध्ये स्थानिक लोकांचा सहभाग वाढविण्यासाठी तसेच लगतच्या वनक्षेत्राबाबत मालकीची भावना निर्माण करण्याकरीता स्थानिक प्राधान्याने आदिवासी युवकांना इको टुरीझम करीता गाईडचे प्रशिक्षण तसेच वन क्षेत्रातील पक्षी, वनस्पती, वृक्ष, प्राणी, नद्या, फोटोग्राफी, टेंट, कॅमेरा, पुस्तक (पक्षी, प्राणी, वृक्ष, औषधी व वनस्पती आदिबाबत हिंन्दी, मराठी व इंग्रजी पुस्तके) गणवेष, ओळखपत्रे आदि साहित्य पुरवावे. आदिवासी युवकांच्या गटांना टाटा जिप्सी वाहन उपलब्ध करुन देवून सदर वाहनांनाच टुरीझम झोन मध्ये प्रवेश द्यावा. तसेच इतर खाजगी वाहनांना टुरीझम झोन मध्ये संबंधीत उपवनसंरक्षक यांनी प्रवेश निषिध्द करावा. गाईड म्हणून आदिवासी युवकाची निवड करतांना गुणवत्ता व भौगोलीक स्थितीचा विचार करावा. निवड करण्यात आलेल्या युवकांना प्रशिक्षण व साधन सामग्री पुरविणे व नियोजन करण्यासाठी सातपुडा फाऊंडेशन, निसर्ग संरक्षण संस्था, अमरावती, अजिंक्य ॲडव्हेंचर ग्रुप, आकोला सारख्या स्वयंसेवी संस्थांचे सहकार्य घ्यावे. सदर योजनेसाठी निधी प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं. यांनी त्वरीत उपलब्ध करुन द्यावा. आदिवासी युवकांचे गट करुन त्यांना जिप्सी वाहन पुरवण्याबाबतची कार्यवाही प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं. यांनी करावी.

**ग) सर्व सिंचन तलाव, गाव तलाव, पाझर तलाव, कोल्हापूरी बंधारे व इतर जलसाठे यांचे नुतनीकरण करणे व सिंचन तलावाच्या मग्रारोहयो अंतर्गत नुतनीकरणाच्या कामासाठी तसेच वन तलावांच्या कामासाठी पालक अभियंता म्हणून नेमणूक करणे.**

अस्तित्वात असलेले अनेक जलाशयांची साठवण क्षमता कमी झाली असून ज्या ठिकाणी सिंचन सुविधा उपलब्ध आहे तेथील सिंचन क्षमता देखील कमी झालेली आहे. या जलाशयाचे नुतनीकरण यामध्ये तलावाची दुरुस्ती, गाळ काढणे व त्यावर असलेल्या वितरीकांची दुरुस्ती इत्यादी कामे मग्रारोहयो अंतर्गत करण्यात आली तर आदिवासी मजुरांना मोठ्या प्रमाणावर रोजगार प्राप्त होईल. तसेच या माध्यमातून शाश्वत संपदा निर्माण होऊन आदिवासीचे जीवनमान उंचावेल व वन, वन्यजीव संवर्धनासाठी त्याचा उपयोग होईल. उप आयुक्त (रो.ह.यो.) आयुक्त कार्यालय व कार्यकारी अभियंता, ल.सिं., जि.प. यांनी लघु पाटबंधारे व इतर सर्व यंत्रणांच्या सर्व जलाशयाची यादी तयार करावी. आवश्यक त्या जलाशयाच्या नुतनीकरणासाठी नवीन अंदाजपत्रके तयार करुन त्यास तांत्रीक / प्रशासकीय मान्यता त्वरीत प्राप्त होईल असे कटाक्षाने पहावे. सदरचे जलाशय ज्या यंत्रणेचे अधिनस्त आहे त्या यंत्रणेनी मग्रारोहयो अंतर्गत कार्यवाही तात्काळ करावी. यंत्रणेने कुशल कामासाठी मागणी करावी व तहसिलदार यांनी त्यास तात्काळ मान्यता द्यावी.

वन तलावाचे अंदाजपत्रके तयार करुन कामाकरीता तांत्रीक सहाय्य आवश्यक आहे. कार्यकारी अभियंता, स्था.स्त. पाटबंधारे वा इतर पाटबंधारे विभागातील अभियंत्यांची अशा वन क्षेत्रांमध्ये पालक अभियंता म्हणून नेमणूक करावी. वन तलावांबाबत वन विभागांनी त्वरीत संबंधीत अंमलबजावणी यंत्रणेस ना-हरकत प्रमाणपत्र द्यावे. वन तलावाकरीता नविन योग्य स्थळे शोधून, मग्रारोहयो अंतर्गत अंदाजपत्रके तयार करुन कामे करावीत. शिवकालीन पाणी पुरवठा योजना तसेच महात्मा फुले जलभूमी संधारण योजने अंतर्गत प्राप्त निधीसुध्दा तलाव दुरुस्ती व तलावातील गाळ काढण्यासाठी वापरता येईल.

**ह) धडक सिंचन विहीर / पंतप्रधान पॅकेज विहीर / रोहयो विहीर अपूर्ण कामे पूर्ण करणे.**

संरक्षीत क्षेत्रांमध्ये उपरोक्त योजनांमधील विहीरींची कामे ब्लास्टींग अभावी अपूर्ण राहलेली आहेत सबब संबंधीत यंत्रणांनी वन विभागासोबत समन्वय साधून ही कामे पूर्ण करावीत. त्याकरीता गाव

निहाय ब्लास्टींग आवश्यक असलेल्या विहीरींची यादी खातेदारांच्या नावासह संबंधीत वन विभागास पुरवावी. विहीरीच्या ब्लास्टींगसाठी परवाना धारक ब्लास्टर यांचे मार्फत गावनिहाय कार्यक्रम तयार करुन, वन विभागाच्या मान्यतेने त्या विभागातील अधिकारी/कर्मचारी यांचे उपस्थितीत ब्लास्टींगचे काम करण्यात यावे.

**ज) विहीरींना जमीनीपासून ३ फुट वर दगडी भिंत उभारणे, कालवे, महामार्ग यावर कृत्रीम संचारमार्गांची निर्मीती.**

मग्रारोहयो, धडक सिंचन विहीरीना अंदाजपत्रकात ३ फुट वर दगडी भिंत उभारण्याचे नमूद करावे तसेच याआधी बांधलेल्या विहीरींचे वर ३ फुट दगडी मुंडाळ बांधण्याबाबत कार्यवाही करावी. यामुळे वन्यजीव व स्थानिक लोक, त्यांची मुले सुध्दा अशा विहीरींपासून सुरक्षीत राहतील. परिस्थितीकी विकास कार्यक्रम राबविणाऱ्या ज्या गावांच्या परिसरात कालवे व महामार्ग अस्तित्वात आहेत तेथे वन्यजीवांसाठी सुरक्षीत कृत्रीम संचारमार्ग निर्माण करण्यात यावे.

**ढ) मासेमारी व वनवणवा नियंत्रणाचे कंत्राट स्थानिक संस्थांना मिळणेबाबत.**

पाटबंधारे तलावाचे मासेमारी हक्क मत्स्यव्यवसाय विभागाकडे असून सदर तलावाचे मासेमारीचे ठेके मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना देण्यात येतात. परिस्थितीकी विकास कार्यक्रम राबविणाऱ्या ज्या गावांमध्ये सहकारी संस्था उपलब्ध आहेत त्या संस्थांना मासेमारीचे कंत्राट देण्यात यावे. यापैकी काही संस्था हया तांत्रीक कारणास्तव अपात्र ठरलेल्या आहेत. त्यामुळे त्यांना कंत्राट देण्यात आला नाही. यासंबंधी या संस्था कशा पात्र ठरतील यासाठी जिल्हाधिकारी यांनी कार्यवाही करावी. तसेच वनवणवा नियंत्रणाचे कंत्राटही ग्रामपरिस्थितीकी विकास समितीलाच देण्यात येईल. वनवणवा नियंत्रणाचे कार्य समाधानकारक नसल्यास संरक्षीत क्षेत्राचे प्रमुख हे काम नजीकच्या ग्राम परिस्थितीकी समितीला देऊ शकतील.

उपरोक्त प्रमाणे इको डेव्हलपमेंट कार्यक्रम सर्व जिल्हाधिकारी यांनी आपले जिल्हयात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा, उपवनसंरक्षक, उप आयुक्त (पशुसंवर्धन), उपसंचालक, सामाजिक वनीकरण यांचे सहकार्याने आपले जिल्हयात वनक्षेत्र, अभयारण्य निहाय कालबध्द नियोजन करुन राबवावा.

**८) ग्राम परिस्थितीकी विकास समितीचे कर्तव्य व जबाबदाऱ्या :**

१. वनाचे, वन्यजीवांचे व जैवविविधतेचे संरक्षण व संवर्धन संयुक्तपणे करणे.
२. वन गुन्हयांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वन अधिकाऱ्यांसोबत सहकार्य करणे.
३. सूक्ष्म नियोजन आराखडयाची योग्यरितीने अंमलबजावणी करणे.
४. इतर विभागांशी समन्वय साधून ग्राम विकासातून वन्यजीव संरक्षण व पर्यटनाच्या योजना आखणे व राबविणे.
५. संरक्षीत वनक्षेत्रात निसर्ग पर्यटनाच्या कामाला चालना देणे करीता राज्याच्या निसर्ग पर्यटन धोरणानुसार योजना तयार करुन त्याची अंमलबजावणी करणे. यामध्ये स्थानिक पर्यटन स्थळांचा त्यांचा ऱ्हास न होता विकास करणे. यामधून स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे व त्या स्थळांचे महत्त्व सर्वसामान्यांपर्यंत पोहचविणे याची दखल घेतली जाईल.

६. गांव परिसरातील प्रेक्षणीय स्थळे तसेच गड, किल्ले, धबधबे, कुंड इ. ठिकाणी भेट देणाऱ्या पर्यटकांकडून उपद्रव शुल्क व प्रवेश शुल्क वसुलीचे अधिकार समितीस राहतील. जेणेकरुन पर्यटन स्थळाची स्वच्छता, पावित्र्य व निसर्ग समतोल साधता येईल.

७. अवैध वृक्षतोड, चराई, वणवा, शिकार अशा प्रकरणी समितीने दंडनिहाय कार्यवाही करणे अभिप्रेत आहे.

वरील प्रमाणे समितीने त्यांचे कर्तव्य व जबाबदारी पार पाडल्याबद्दल वनपरिक्षेत्र अधिकारी व व्यवस्थापन समिती संयुक्तपणे मुल्यांकन करुन दरवर्षी (वित्तीय वर्ष) उपवनसंरक्षक / वनसंरक्षक / मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांचेकडे अहवाल सादर करेल.

**९) संरक्षीत क्षेत्रात असलेली निसर्गरम्य ठिकाणे व गड-किल्ले ग्रामपरिसर विकास समितीचे कार्यक्षेत्रात आणणे.**

ग्राम परिस्थितीकी विकास समितीच्या संरक्षीत क्षेत्राच्या विकास व संरक्षणाच्या कामामधील मुल्यांकन अहवाल समाधानकारक असल्यास अशा समित्यांना परिसरातील स्थळांचा निसर्ग पर्यटनाकरीता वापर करता येईल. पर्यटकांना आकर्षित करुन पर्यटनापासून मिळणारे उपद्रव व इतर शुल्क असे उत्पन्न समितीला घेता येईल. पर्यटन स्थळाचा ऱ्हास होऊ नये यास्तव ग्राम परिस्थितीकी विकास समिती प्रशिक्षित मार्गदर्शकाच्या सेवा उपलब्ध करुन देईल व त्यायोगे या मार्गदर्शक युवकांना रोजगार उपलब्ध होऊ शकेल. हे मार्गदर्शक शुल्क निश्चितीचे अधिकार ग्राम परिस्थितीकी विकास समिती निश्चित करेल. पर्यटकांकडून मिळणारे शुल्क हे समितीव्दारे खात्यामध्ये भरण्यात येईल.

जी ग्राम परिस्थितीकी विकास समिती किल्ल्याकडे जाणाऱ्या पाऊलवाटेची स्वच्छता व देखभाल करण्याची जबाबदारी घेईल. त्या समितीस राज्याच्या निसर्ग पर्यटन योजनेतून अनुदान देण्यात येईल. वन विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत सदर समिती खालील प्रमाणे कामे करतील.

१. सर्व किल्ल्यावर जाण्याचे पारंपारिक मार्ग खुणांनी दर्शविण्यात येतील.

२. किल्ल्यावर जाण्याचे प्राचीन मार्ग वापरायोग्य / सुस्थितीत ठेवतील.

३. किल्ल्यावर पिण्याचे पाणी / स्वच्छतागृहांची व्यवस्था ठेवतील व वनवणवा प्रतिबंधक उपाययोजना आखून राबवतील.

तसेच जुनी विश्रामगृहे असल्यास चालू स्थितीत ठेवणे व पुरातत्व विभागास आवश्यक त्या सुधारणा करण्यास वनसंवर्धन कायद्याच्या अधीन राहून परवानगी देणे ही कामे वन विभागामार्फत करण्यात येतील.

संरक्षीत क्षेत्रामध्ये पर्यटकांसाठी ग्राम पर्यटन आवास व तत्सम सोयी सुविधा उपलब्ध करुन गावामध्ये रोजगार निर्मिती करणे. पर्यटनाला चालना देण्यासाठी गावांतील बेरोजगार युवावर्गास विविध प्रकारचे प्रशिक्षण देवून त्यांचा क्षमता विकास करणे. (उदा. आदरातिथ्य व स्वयंपाक कुशलताचे विकास करणे)

**आर्थिक नियोजन**

**लाभार्थी निवड :** संबंधीत ग्रामसभेने लाभार्थ्यांची निवड करतांना संरक्षीत क्षेत्रावरील दबाव कमी करणाऱ्या व मानव-वन्यप्राणी संघर्ष कमी करण्यात सहभागी होणाऱ्या कुटुंबाची निवड करावी.

सदर कुटूंब स्वयंसहायता बचत गट (Self Help Group) किंवा उपयोगी गट (User group) शी संलग्नीत असावा.

निवड झालेल्या लाभार्थ्यास निवड केलेल्या कामाच्या एकुण खर्चाच्या रकमेच्या ७५% रक्कमेची शासनातर्फे प्रतिपुर्ती करण्यात येईल. उर्वरीत २५% रक्कम लाभार्थ्यांने श्रमदान व स्वत:चे योगदानातून द्यावयाची आहे.

**निधी वितरण प्रणाली** :- शासनातर्फे द्यावयाच्या ७५% निधीचे वितरण ३ टप्प्यांमध्ये करण्यात येईल. याकरीता १) ग्रामविकास आराखडा झालेला असावा. (२) कामाचे स्वरुप निश्चित करण्यात आलेले असावे. (३) लाभार्थ्यांची निवड झालेली असावी. (४) करारनामा झालेला असावा.

याकरीता १) निसर्ग, साहस व वन्यजीव पर्यटन विषयक कामे (२) वन / वन्यजीव संरक्षण विषयक कामे यामध्ये वनवणवा प्रतिबंधक कामांच्या समावेश राहील. (३) बांधकामे

७५% रकमेचे खालील प्रमाणे ३ टप्प्यांमध्ये वाटप करण्यात यावे.

प्रथम टप्पा - काम सुरु करण्यापूर्वी

व्दितीय टप्पा - कामाची समाधारकारक प्रगती झाल्यानंतर

तृतीय टप्पा - काम पूर्ण झाल्यानंतर

याकरीता प्रत्येक कामाचे स्वतंत्र अंदाजपत्रक तयार करावे व त्यामध्ये मजुरी व साहित्य खरेदीची रक्कम स्वतंत्रपणे दाखवावी.

**आर्थिक तरतूद** : प्रत्येक कामाकरीता लागणाऱ्या निधीची उपलब्धता खालील स्त्रोतांमधून करण्यात येईल.

१) आदिवासी लाभार्थ्याकरीता - आदिवासी उप-योजना

२) अनुसुचीत जातीचे लाभार्थ्याकरीता - अनुसुचीत जाती योजना

३) वर क्र. १ व २ मध्ये नसलेल्या लाभार्थ्याकरीता अ) ७% जिल्हा परीषद निधी

ब) कॅम्पा

क) १३ वा वित्त आयोग

ड) राज्य वन विकास यंत्रणा

याशिवाय व्याघ्र प्रकल्पाचे बफर क्षेत्रातील गावांकरीता टायगर कंझरर्व्हेशन फाऊंडेशन मधील निधीचा देखील वापर करण्यात येईल.

**शुल्काचा वापर**

पर्यटकांकडून मिळणारे शुल्क हे पर्यटन स्थळाची साफसफाई, संरक्षण, माहिती फलक लावणे व पर्यटकांसाठी गाईड म्हणून नेमणूक करण्याकरीता वापरण्यात येईल.

**ग्राम परिस्थितीकी विकास समितीची / सदस्यांची मान्यता रद्द करणे**

ग्राम परिस्थितीकी विकास समितीने त्यांचे कर्तव्ये व जबाबदाऱ्या विशेषत: संरक्षीत क्षेत्राच्या वन्यजीव व्यवस्थापन आराखड्याच्या कार्य आयोजनेच्या तरतुदींचे पालन योग्यरितीने हाताळण्यात हयगय केल्यास उपवनसंरक्षक /वनसंरक्षक /मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) ही समिती बरखास्त करु शकतील.

सदस्यांची सदस्यता रद्द करण्याचा निर्णय ग्राम परिस्थितीकी विकास समिती घेईल. हे करतांना नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वाचे पालन करण्यात येईल.

**अपील**

समिती / सदस्याची सदस्यता भंग झाल्यानंतर एक महिण्याचे आत समिती / सदस्य संबंधीत अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांचेकडे अपील करु शकतील. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांचा निर्णय हा अंतिम राहील.

**राज्यपातळीवर समिती**

ग्राम परिस्थितीकी विकास समिती कार्यक्रमांच्या अंमलबजावणी करतांना उदभवणारे अनेक प्रश्न सोडविण्यासाठी व ग्राम परिस्थितीकी विकास समित्या सुरळीतपणे काम करतील याची खात्री करण्यासाठी प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली पुढे नमूद केल्याप्रमाणे राज्यस्तरीय सुकाणू समिती गठीत करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य, नागपूर | अध्यक्ष |
| २. | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) म.रा. नागपूर | सदस्य |
| ३. | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संरक्षण) म.रा. नागपूर | सदस्य |
| ४. | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पुर्व, नागपूर | सदस्य |
| ५. | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पश्चिम, नाशिक | सदस्य |
| ६. | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (तंत्रज्ञान व धोरण) नागपूर | सदस्य |
| ७. | मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती | सदस्य |
| ८. | समितीमधून निवड केलेले ३ महिला प्रतिनिधी, पुरुष प्रतिनिधी-७, स्वयंसेवी संस्थेचे २ प्रतिनिधी | सदस्य |
| ९. | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (निसर्ग पर्यटन - वन्यजीव प्रशासन) | सदस्य-सचिव |

■ ■ ■

परिशिष्ट- २

## समझौता समयलेख्याचे प्रारुप

--------- अभयारण्य / राष्ट्रीय उद्यान/ व्याघ्र प्रकल्पालगतचे ------ गाव / पाडा यामध्ये सुक्ष्म नियोजन आराखड्याच्या अंमलबजावणीकरिता करारनामा.

सदर करारनामा ---------- वनपरिक्षेत्र अधिकारी, वन्यजीव विभाग --------- (यांना यानंतर पक्ष क्रमांक १ असे संबोधण्यात येईल) व --------- गाव ------- तालुका ------- जिल्ह्यातील ग्राम परिस्थितीकी विकास समिती (यांना यानंतर पक्ष क्रमांक २ असे संबोधण्यात येईल) यांचे दरम्यान ----- गावाचे मंजुर सुक्ष्म नियोजन आराखड्याचे अंमलबजावणीकरिता करण्यात येत आहे.

१. ग्राम सभेव्दारे गांवामध्ये पारिस्थितीकी विकास कार्यक्रम राबविण्यास तयार असल्याबाबत ठराव दिनांक ----- चे सभेत पारित करण्यात आलेला आहे.
२. ग्राम पारिस्थितीकी विकास कार्यक्रमाअंतर्गत मिळणारे फायदे घेण्याकरिता कुऱ्हाड बंदी, चराई बंदी, भाकड गुरांची संख्या कमी करून दुधाळ जनावरे पाळणे, अनुत्पादक वळुंचे १०० टक्के खच्चीकरण करणे, सर्व गुरांचे लसीकरण करणे, गुरांना गोठ्यातच चारा पुरविणे, वनवणवा नियंत्रण व संरक्षण कामात सहकार्य करणे व गौण वनउपजांचा ऱ्हास थांबविणे या बाबींमध्ये गावाच्या जबाबदाऱ्या व कर्तव्य पार पाडण्यास ग्राम सभेची संमती आहे.
३. ग्राम पारिस्थितीकी विकास कार्यक्रमाअंतर्गत निसर्ग/वन्यजीव पर्यटन विकासकामे, आवश्यक बांधकामे व वनवणवा संरक्षणकामे गावव्दारे फायदे मिळण्यास समिती पात्र राहील. या अंतर्गत येणाऱ्या खर्चाच्या ७५ टक्के रकमेचे अनुदान शासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांमधुन देण्यात येईल. उर्वरित २५ टक्के रक्कम लाभधारकाला / समितीला श्रमदानाव्दारे तसेच स्वतःचे योगदानाव्दारे खर्च करावे लागतील.
४. शासनाव्दारे देण्यात येणारे ७५ टक्के अनुदान ३ टप्प्यांमध्ये देण्यात येईल. प्रथम टप्पा काम सुरु करण्यापूर्वी, व्दितीय टप्पा कामाची प्रगती समाधानकारक असल्यास व तृतिय टप्पा कामाची पुर्तता झाल्यानंतर देण्यात येईल.
५ प्रत्येक कामाचे स्वतंत्र अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक राहील. अंदाजपत्रकामध्ये मजुरी व साहित्य खरेदी करिता येणारा खर्च स्वतंत्रपणे दर्शविण्यात येईल.

| | |
|---|---|
| स्वाक्षरी<br>अध्यक्ष<br>------ग्राम पारिस्थितीकी विकास समिती | स्वाक्षरी<br>वनपरिक्षेत्र अधिकारी<br>--------अभयारण्य/राष्ट्रीय उद्यान/व्याघ्र प्रकल्प |
| साक्षीदार | साक्षीदार |
| १.---------------------------- | १.------------------------------ |
| २. ---------------------------- | २. ------------------------------ |

टिप : सदर करारनाम्यामध्ये स्थानिक परिस्थितीनुसार आवश्यक ते बदल करण्यात यावे.

## सूक्ष्म नियोजन आराखडा तयार करण्याकरीता मार्गदर्शक सुचना

ग्राम परिसर विकास कार्यक्रम राबविण्याकरीता ग्रामस्थांनी संबंधीत वन्यजीव विभागाच्या सहकार्याने सूक्ष्म नियोजन आराखडा (Microplan) तयार करावा व तो राबविण्याकरीता आवश्यक करारनामा करावा. सूक्ष्म नियोजन आराखडा सदर कार्यक्रम राबविण्याकरीता मुलभूत आधार राहील व त्यात वन्यजीव विभाग व ग्रामस्थ यांचे परस्पर मान्य बांधीलकी राहील. (वस्तुनिष्ठ माहिती, परस्पर मान्य बंधन, वेळापत्रक, सनियंत्रण दर्शक इत्यादी) प्रत्येक गट ग्रामःकरीता स्वतंत्र सूक्ष्म नियोजन आराखडा तयार करण्यात यावा व त्यात सर्व गटांचे प्रतिनिधीच, महिला / पुरुष दोघांचाही निर्णायक संस्थेत / समितीत समावेश असावा.

**सूक्ष्म योजनेत समाविष्ठ बाबी.**

सूक्ष्म योजनेत सर्व स्थळ निहाय विवरणाचा समावेश असावा. उदाहरणार्थ : संसाधनांचे विश्लेषण, सामाजिक व आर्थीक स्थिती, संरक्षीत क्षेत्रावर अवलंबन व संरक्षित क्षेत्र व मानव संबंधी सर्व बाबींचा समावेश सूक्ष्म योजनेत करावा.

सूक्ष्म योजनेत खालील दर्शविलेल्या बाबीचा समावेश करण्यात यावा.

| | | |
|---|---|---|
| १. | स्थळाचे विवरण | स्थळाचे क्षेत्र, चतुर्सिमा, पाणलोट क्षेत्र, स्थळाचे स्वरुप, स्थळाची निवड करण्याकरीता कसोटी. |
| २. | स्थळाची स्थिती : | भौतिक, नैसर्गीक, सामाजिक व आर्थीक स्थिती आणि स्थानिक बाबी |
| ३. | लाभार्थ्यांचे विश्लेषण | लाभार्थी यांचे संरक्षीत क्षेत्रावर अवलंबन, सामाजिक मुद्दे, ग्रामस्थांचे मत, अनुकूल व प्रतिकूल प्रभाव, ग्रामस्थांशी झालेल्या PRA चे निष्कर्श. |
| ४. | संकल्पना, व्याप्ती आणि तंत्रनिती | |
| ५. | सूक्ष्म योजनेची उद्दिष्टे | |
| ६. | सूक्ष्म योजनेचे घटक (components) परस्पर मान्य बाबींसह | |
| ७. | निवडलेल्या गावांच्या ५ किलोमीटर परिघीत येणारी गावे. | |
| ८. | लोकसंख्या | |
| ९. | ग्रामस्थांना उपलब्ध रोजगाराची सद्यःस्थिती | |
| १०. | पशुधन संख्या | |
| ११. | अ) गावातील पशुधनाकरीता चाऱ्याचे स्त्रोत / आपुर्ती आणि आवश्यकता | |
| | ब) गावात उपलब्ध होणाऱ्या जळतनाचे स्त्रोत आणि आवश्यकता | |
| १२. | व्यवसाय | |

| | |
|---|---|
| १३. | अ) गावातील भूमीचे वापर व पध्दती |
| | ब) वनेत्तर भुमीची उपलब्धता |
| | क) कृषि प्रकार |
| | ड) कृषि उपज व परिमाण |
| १४. | वनक्षेत्र |
| | अ) वनक्षेत्र व वितरण |
| | ब) सिमांकन व चतुर्सिमा |
| | क) निस्तार हक्काबाबत माहिती |
| | ड) राजस्व क्षेत्रावरील वनक्षेत्र |
| | इ) गावातील चराई क्षेत्र व उपलब्धता |
| १५. | सूक्ष्म योजनेवर होणाऱ्या खर्चाचे विवरण व अंदाजपत्रके |
| १६. | सूक्ष्म योजनेवरील आर्थीक नियोजन, खर्च विवरणासह आणि त्यात ग्रामस्थांचा भाग (भाग भांडवल / श्रमदान) |
| १७. | लेखांकन पध्दती आणि लेखा परिक्षा |
| १८. | लाभार्थ्यांना लाभ वितरण करण्याबाबत मानक कसोटी. |
| १९. | संस्था विषयक व्यवस्था |
| २०. | सनियंत्रण व मुल्यांकन |
| २१. | वन्यजीव विभागाच्या व ग्राम परिस्थितीकी विकास समितीच्या जबाबदाऱ्या आणि बंधन |
| २२. | योजना राबविण्याबाबतचे वेळापत्रक |
| २३. | वन्यजीव विभाग आणि ग्राम परिस्थितीकी विकास समितीमध्ये झालेला करारनामा (MoU) |
| २४. | परिशिष्टे, तक्ते, नकाशे इत्यादी. |

टिप : सदर आराखडा तयार करते वेळी परिस्थिती नुसार आवश्यक फेरफार व बदल करण्यात यावे.